# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन
# जिल्हा परिषद सातारा

## जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर द्यावयाची जाहिरात

जिल्हा परिषद सातारा मार्फत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनमध्ये व तालुक्यातील गट संसाधन केंद्र (पाणी व स्वच्छता ) मध्ये निर्मल भारत अभियान व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यांच्या कालावधीकरिता खालील पदांची भरती करावयाची आहे. यासाठी खालील शैक्षणीक पात्रता व अनुभव असलेल्या उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरची पदे हि केवळ मानधनी व कंत्राटी असल्याने कधीच शासकीय सेवेत कायम करण्यात येणार नाहीत. सदरची जाहिरात जिल्हा परिषद सातारा कडील वेबसाईट www.zpsatara.gov.in या वेबसाईटवर सविस्तर माहितीसह उपलब्ध असुन ती पाहणे आवश्यक आहे.

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनमध्ये भरावयाच्या पदाचा तपशिल

| अ.क्र. | पदाचे नाव व पदसंख्या | शैक्षणीक अर्हता | अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | मुल्यमापन व MIS सल्लागार पदसंख्या - १ | कोणत्याही विषयातील पदवी किमान ५० टक्के गुणांसह व संगणकाचे ज्ञान- MS -Office | स्वयंसेवी संस्था अथवा शासकिय विभागामधिल M.I.S. व सनियंत्रणाबाबत जिल्हास्तरावरील २ वर्ष कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | रु. १३०००/- दरमहा अधिक प्रोत्साहन मानधन रु.५०००/- |
| २ | वित्त नि संपादणूक अधिकारी पदसंख्या - १ | वाणिज्य शाखेतील पदवी किमान ५० टक्के गुणांसह व संगणकाचे ज्ञान- MS -CIT | स्वयंसेवी संस्था अथवा शासकिय विभागामधिल २ वर्ष कामाचा अनुभव | रु. १३०००/- दरमहा अधिक प्रोत्साहन मानधन रु.५०००/- |
| ३ | शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार पदसंख्या - १ | कोणत्याही विषयातील पदवी अधिक बी.एड. अथवा एम.एस.डब्लु. संगणकाचे MS – Office ज्ञान आवश्यक | स्वयंसेवी संस्था अथवा शासकिय योजनेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील किमान २ वर्ष कामाचा अनुभव | रु. १३०००/- दरमहा अधिक प्रोत्साहन मानधन रु.५०००/- |

**वयोमर्यादा** – जिल्हास्तरावरील सर्व पदांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४० वर्षे राहिल.

## गट संसाधन केंद्रामध्ये भरावयाच्या पदाचा तपशिल

| अ. क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | मासिक मोबदला/ मानधन | प्रवास भत्ता | मोबाईल / दुरध्वनी भत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गट समन्वयक Block Coordinator पदसंख्या- ५ | **किमानः** बी.एस.डब्ल्यु. किंवा प्रसिध्दी माध्यमे/ समाज विज्ञान शास्त्रातील पदवीधर<br>**प्राधान्य :** एम.एस.डब्ल्यु.<br>**अनुभव :** ग्रामीण भागात ग्रामीण पाणी पुरवठा समित्या, पाणी गुणवत्ता व संनियंत्रण, ग्रामीण स्वच्छता, आरोग्य विषयक कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव | २५ ते ३५ वर्षे माजी सैनिकांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे | रु.६०००/- | रु.१५००/- दरमहा एकत्रीत | रु.१०००/- दरमहा |
| २ | समुह समन्वयक Cluster Coordinator पदसंख्या- ११ | **किमानः** बी.एस.डब्ल्यु. किंवा प्रसिध्दी माध्यमे/ समाज विज्ञान शास्त्रातील पदवीधर<br>**प्राधान्य :** एम.एस.डब्ल्यु.<br>**अनुभव :** ग्रामीण भागात ग्रामीण पाणी पुरवठा समित्या, पाणी गुणवत्ता व संनियंत्रण, ग्रामीण स्वच्छता, आरोग्य विषयक कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव | २५ ते ३५ वर्षे माजी सैनिकांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे | रु.५५००/- | रु.१५००/- दरमहा एकत्रीत | रु.१०००/- दरमहा |

**टिप**- १. गट समन्वयक हे पद रिक्त असलेले तालुके व रिक्त पदसंख्या-खटाव १, माण १, फलटण १, खंडाळा १,जावली१

२. समुह समन्वयक हे पद रिक्त असलेले तालुके व रिक्त पदसंख्या - माण २, खंडाळा २, जावली १, महाबळेश्वर १, वाई १, कराड १, पाटण ३

**अर्ज करणेबाबतच्या अटी व नियमः-**

१) उमेदवाराने कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करावा.

२) उपरोक्त नमुद शैक्षणिक अर्हता व अनुभव असणाऱ्या उमेदवारांनीच अर्ज करावेत. नमुद शैक्षणिक अर्हता व अनुभव नसणाऱ्या उमेदवारांनी अर्ज करु नयेत असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्यात अर्ज करावा. कागदाचा आकार ए ४ साईज असावा व त्यावर पासपोर्ट आकाराचा अलिकडील काळात काढलेला (स्वतःची स्वाक्षरी केलेला) फोटो अर्जावर लावावा. यासोबत परीक्षेसाठी ओळखपत्रासाठी अलिकडील काळातील फोटो व त्यावरती राजपत्रित अधिका-याची स्वाक्षरी घेणेत यावी.

४) उमेदवारांनी अर्जासोबत जाहिरातीत दर्शविलेल्या शैक्षणिक अर्हता व आवश्यक अनुभवास अनुसरुन आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या व इतर अनुषंगीक कागदपत्रांच्या सुस्पष्ट दिसतील अशा राजपत्रित अधिका-याने साक्षांकीत केलेल्या छायांकित प्रती जोडणे अनिवार्य राहिल.

५) अर्ज करणा-या उमेदवारांनी परिक्षा शुल्क राष्ट्रीय ग्रामीण पेयजल सहाय्य निधी, जिल्हा परिषद सातारा (Rashtriya Gramin Peyajal Sahaya Nidhi, Z.P. Satara ) यांचे नावे भारतीय स्टेट बँक, कृषि विकास शाखा, सातारा येथे देय असलेला रेखांकित डिमांड ड्राफ्ट शुल्क मागासवर्गीयसाठी रु.१००/- व सर्वससाधारण उमेदवारांसाठी रु. २००/- आहे. डीडीच्या मागे अर्जदाराने संपूर्ण नांव व पत्ता लिहिणेत यावा तसेच अर्जासोबत ४.५ बाय ९.० से.मी. आकाराचा रु.५/- चे पोस्टाचे तिकीट लावलेला व स्वतःचा पूर्ण पत्ता पिनकोडसह लिहिलेला लिफाफा जोडणेत यावा. सदर लिफाप्यावर कोणत्या पदासाठी अर्ज केला आहे हे स्पष्ट लिहावे.

६) अर्ज सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, सातारा यांचे नावे दिनांक २४/०१/२०१४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी मिळतील अशा बेताने पाठवावेत. यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही तसेच पोस्टाचे विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याशिवाय उमेदवार स्वतः पूर्ण भरलेला अर्ज जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, विस्तारीत इमारत, जिल्हा परिषद, सातारा येथे कार्यालयीन वेळेत समक्ष दाखल करु शकतील. अर्जाची पोहोच पाहिजे असलेस अर्ज पोहोच पावतीसह नोंदणीकृत डाकेने पाठवावेत. (रजि. एडी) अर्जाच्या लखोटयावर व पोहोच पावतीवर पदाचे नाव लिहिणे आवश्यक आहे. सदरची पदे केंद्र शासनाने दिलेल्या सुचनांनुसार पूर्णपणे कंत्राटी असून शासन सेवेचे फायदे लागू नाहीत.

सदरची पदे गट संसाधन केंद्रे चालू असेपर्यंत अगर निधी उपलब्ध होईतोपर्यंत चालू राहतील.

**निवड कार्यपध्दती :**

१) उमेदवाराची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी. जि. प. सातारा यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या जिल्हा निवड समितीमार्फत व कार्यपध्दतीनुसार करणेत येणार आहे.

२) जिल्हा परिषदेस प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी दिनांक ३१/०१/२०१४ रोजी वेळ सायं. ५ पर्यंत जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावरती प्रसिध्द करणेत येईल. सदरची यादी पाहणेची जबाबदारी उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास लेखी स्वरुपात कळविणेत येणार नाही.

३) दि.१२/१२/२०१२ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार एका पदास सहा पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले तर ५० गुणांची बहूपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परिक्षा खालीलप्रमाणे घेणेत येईल.

**लेखी परिक्षा :**

| विषय | प्रश्न संख्या | गुण | परिक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|
| सामान्य ज्ञान | १० | १० गुण | १ तास |
| बौध्दिक व विश्लेषणात्मक क्षमता | १० | १० गुण | |
| गणितीय क्षमता | १० | १० गुण | |
| विषयाचे ज्ञान | १० | १० गुण | |
| संगणकाचे ज्ञान | ०५ | ५ गुण | |
| स्थानिक बाबींचे ज्ञान | ०५ | ५ गुण | |
| एकुण | ५० | ५० | १ तास |

४) उपरोक्त नव्याने भरावयाच्या पदांसाठी एका पदास पाच व पाचपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास त्या पदाची शैक्षणीक अर्हता, अनुभव व मुलाखतीद्वारे निवड करण्यात येईल.

५) लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांना गुणक्रमानुसार मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

६) रिक्त पदांच्या संख्येत कमी जास्त बदल होणेची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.

७) परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, यात बदल करणे, परिक्षा स्थगित करणे, व रद्द करणे इ. बाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती/शासनास राहतील.

८) वरील सर्व पदांची नियुक्ती हि कंत्राटी पद्धतीची असुन ११ महिन्याच्या किंवा त्यापेक्षा कमी कालावधीकरीता नियुक्ती देण्यात येईल. कायम नियुक्तीचा हक्क राहणार नाही.

९) निवड झालेल्या उमेदवारास १०० रु. बंधपत्रावर करारनामा लिहून द्यावा लागेल. तसेच शासनाच्या इतर कोणत्याही सुविधा मिळणार नाहित.

१०) वरील सर्व पदांची नियुक्ती ही कंत्राटी पद्धतीची असलेने शासनास सदर पदांची आवश्यकता नसलेस कोणतेही कारण न देता सेवा समाप्त करणेत येईल.

११) अपुर्ण भरलेले तसेच नमुद कागदपत्रे न जोडलेले व चुकिची माहिती असलेले अर्ज विचारात घेतेले जाणार नाहीत.

१२) गट संसाधन केंद्रात निवड होणा-या उमेदवारास जिल्ह्यातील उपरोक्त नमूद कोणत्याही तालुक्यामध्ये गट समन्वयक अथवा समुह समन्वयक या पदावरती काम करावे लागेल.

१३) कोणत्याही टप्प्यावर निवड प्रक्रिया थांबविणे अथवा रद्द करण्याचे अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समीती यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

१४) सदरची जाहिरात जिल्हा परिषद सातारा कडील वेबसाईट www.zpsatara.gov.in या वेबसाईटवर सविस्तर माहितीसह उपलब्ध असुन ती पाहणे आवश्यक आहे.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा.**

जोडपत्र- १

(शासन परिपत्रक क्र.ग्रापाधो १११२/प्र.क्र.२०४/पापु-०७, दिनांक १२ डिसेंबर २०१२ चे जोडपत्र)

# PRESCRIBED PROFORMA

Applied for the Post Name : --------------------------------------------------------

1) Full Name :

2) Date of Birth : (Age as on date of advt):

3) Place of Birth :

4) Educational qualification (From 10th on wards)

| Sr.No. | Name of the qualifying exam | Year of passing | Percentage of marks obtained |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

5) Languages Known (Spoken) :-

6) Languages Known (Written) :-

7) Address for communication with pin code / E.mail :-

8) Tel. No. (Residence & Office)

9) Experience in years :- Years/ Months/ Days

10) Details of employment in chronological order :-

| Sr.No. | Name of the organization | Duration of work in years | Job responsibilities |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

11) Nature of present employment :- (Contract / Permanent)

12) Present total emoluments :-

Date :

Place : Signature

Note :

1. The applications should reach respective Zilla Parishad, by upto 5.00 P.M. (By post or through hand delivery only, electronic applications will not be considered.)
2. Knowledge and fluency (both written and spoken) in Marathi and English language is essential.
3. All the candidates of the above positions should be conversant with computer operations.
4. Please attach attested copies of the relevant documents, the application may not be considered if not supported by relevant documents.
5. Application which are not in prescribed form will be rejected.